# गावगाड्याच्या राजकारणात होणार फेरबदल

## वरुड तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.9) -** वरुड तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींसाठी 2025 ते 2030 या कालावधीसाठी सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. सर्वसामान्य ग्रामस्थांच्या साक्षीने पारदर्शक पद्धतीने ही सोडत काढण्यात आली. या आरक्षणात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, सर्वसाधारण, तसेच महिलांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. यामुळे ग्रामपंचायतीतील महिलांचा सहभाग वाढेल, तसेच मागास घटकांनाही नेतृत्वाची संधी मिळेल, आरक्षणानंतर गावगाड्याच्या राजकारणात फेरबदलही होतील, हे मात्र निश्चित.



मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण प्रक्रिया तहसील कार्यालयात पार पडली. या वेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. सदर सोडत प्रक्रियेसाठी तहसीलदार रामदास शेळके, नायब तहसीलदार पंकज चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर सोलव, शिवसेना शिंदे गटाचे अमोल भुयार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सदर आरक्षण 2030 पर्यंत कायम राहणार असून, त्यामुळे आगामी ग्रामपंचायत



निवडणुकांच्या राजकीय समीकरणांवर याचा मोठा प्रभाव पडणार आहे. काही गावांतील इच्छुकांना अनपेक्षित संधी मिळाल्याने आनंदाचे वातावरण आहे, तर काहींच्या योजना विस्कळीत झाल्याने नाराजीही व्यक्त होत आहे.

### अनुसूचित जातींसाठी आरक्षित मतदारसंघ

जामगाव (खडका), बेनोडा (शहीद), इत्तमगाव, पुसला, टेंभुरखेडा हे मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी आरक्षित असून शिंगोरी, बेसखेडा, आमनेर, पवनी (सक्राजी), चिंचरगव्हाण हे अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित आहेत.

### अनुसूचित जमातींसाठी आरक्षित मतदारसंघ

मोरचुंद, वाठोडा, लिंगा, गाडेगाव, एकदरा हे अनुसूचित जमातीसाठी तर पेठ (मांगरूळी), उदापूर, मांगरूळी, सावंगी, पोरगव्हाण, लोणी हे अनुसूचित जमाती महिलांसाठी आरक्षित करण्यात आले आहेत.

### मागास प्रवर्गासाठी आरक्षण

आलोडा, घोराड, नांदगाव, गव्हाणकुंड, चांदस, सुरळी, वघाळ, सावंगा, राजुराबाजार हे मागास प्रवर्गासाठी; तर बाभुळखेडा, पळसवाडा, कुरळी, शहापूर, करजगाव, देऊतवाडा, इसंबरी, ढगा, अमडापूर हे महिलांसाठी आरक्षित आहेत.

### सर्वसाधारण व सर्वसाधारण महिला आरक्षण

डवरगांव, वंडली, झोलंबा, रोशनखेडा, बेलोरा, ईसापुर, वाईखुर्द, काचुर्णा, जामठी (गणेशपुर), हातुर्णा, उराड, झटामझिरी, जामगाव (महेंद्री) हे खुल्या प्रवर्गासाठी तर वाडेगाव, पिंपळखुटा (बु.), मालखेड, काटी, सातनुर, तिवसाघाट, धनोडी, जरूड, खडका, बहादा, वडाळा, गोरेगाव, पळसोना, बारगाव हे महिलांसाठी आरक्षित आहेत.

# खरवाडीत आषाढी एकादशी उत्साहात साजरी

## दिंडी आणि महाप्रसाद सोहळ्याला विठ्ठलभक्तांची मोठी उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.9) -** आषाढी एकादशी निमित्त खरवाडी ग्रामस्थांनी भक्तिभावाने भरलेला दिंडी व महाप्रसाद सोहळा उत्साहात पार पाडला. विठू माऊली दिंडी मंडळ खरवाडी, तसेच चांदूरबाजार परिसरातील वारकरी मंडळी आणि महिला भजन मंडळ यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



या सोहळ्याचे आयोजन विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थान, खरवाडी यांच्या वतीने करण्यात आले होते. यामध्ये गावातील विविध भजन मंडळे, वारकरी, युवक व नागरिक सहभागी झाले होते. दिंडी सोहळ्याच्या नियोजनासाठी गावातील कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

उत्सवासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्यांमध्ये ओम भुरे, राजेशभाऊ लांबटकर, सुनील भाऊ भुरे, रोशनभाऊ लेंडे, गिरीश बंड, सुजित भुरे, छोटू भुरे, पवन भुरे, सोहम लेंडे, सार्थक लेंडे, सुमित भुरे, राज बंड, पप्पू भुरे, प्रतीक भुरे, मयूर मुंदेकर, आदित्य भुरे, ओम बिसने, अक्षय भुरे, स्वराज अढाऊ यांच्यासह अनेक युवकांनी मोलाची भूमिका बजावली.

त्याचप्रमाणे गावकरी मंडळींपैकी विठ्ठलराव भुरे, अनीलराव बिसने, राजेशभाऊ धांडे, संतोषराव भुरे, प्रवीण भुरे, उमेश अढाऊ, दीपक भुरे, शुभम धांडे, संकेत भुरे, संकेत बिसणे, धीरज बिसणे, सौरभ भुरे आदींनीही आपली सेवा दिली. दिंडी मार्गात हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भक्तीमय वातावरणात सहभागी वारकऱ्यांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाउन टाकला. महिलांनी देखील भजन-कीर्तनाच्या माध्यमातून आपला सहभाग नोंदवला. या कार्यक्रमासाठी सोपान महाराज वाघमारे (भक्तिधाम), अर्जुन महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी आणि महाप्रसादाचे आयोजन सुरळीत पार पडले. संपूर्ण कार्यक्रमात शिस्तबद्धतेसह भक्तिभाव, सामाजिक एकोपा आणि ग्रामैक्याचे दर्शन घडले. खरवाडीतील आषाढी एकादशीचा हा सोहळा गावकऱ्यांसाठी स्मरणीय आणि प्रेरणादायी ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# दर्यापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार निवारण दिन साजरा

## पोलीस स्टेशनचा अभिनव उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, (दि.9) -** नागरिकांच्या तक्रारी वेळेत आणि प्रभावीपणे सोडवण्यासाठी दर्यापूर पोलीस स्टेशनने एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत शनिवारी पोलीस स्टेशनमध्ये 'तक्रार निवारण दिन' साजरा करण्यात आला.

या वेळी पोलीस निरीक्षक सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध तक्रारदारांच्या अर्जांची सुनावणी करण्यात आली व काही तक्रारींचे तत्काळ निवारणही करण्यात आले. कार्यक्रमाला पोलीस उपनिरीक्षक रोहित सोनटक्के, सुनील साबळे तसेच संबंधित तक्रारदार उपस्थित होते. तक्रार निवारण दिनाच्या उद्देशाबाबत माहिती देताना निरीक्षक वानखडे म्हणाले की, नागरिकांना



थेट पोलीसांशी संवाद साधता यावा, त्यांच्या तक्रारींची नोंद घेऊन कार्यवाहीची माहिती त्यांना देण्यात यावी आणि समस्या तडजोडीच्या मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न व्हावा, ही या उपक्रमामागील भूमिका आहे. तक्रारींचे वेळेत निवारण करून पोलीस व नागरिक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## आदर्श शेतकरी एकनाथराव उताने यांचे 102 व्या वर्षी निधन

**अमरावती, (दि.9)-** भातकुली तालुक्यातील सायत येथील आदर्श शेतकरी एकनाथराव भानुदास उताने यांचे आज बुधवार दिनांक 9 जुलै रोजी निधन झाले ते 102 वर्षाचे होते.



एकनाथ उताने हे पटवारी म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी शेतीमध्ये केलेल्या विविध प्रयोगामूळे त्यांचा आदर्श शेतकरी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाल-श्रीफळ देवून सत्कार केला होता. भातकुली तालुक्यात आदर्श पटवारी म्हणूनही त्यांची ओळख होती. नागपूर येथे सामाजिक कार्यकर्ते दिनेश ठाकरे यांचे ते सासरे होते. त्यांच्या मागे मुलगा नितेश उताने व मुलगी संगीता दिनेश ठाकरे व बराच मोठा आप्त परिवार आहे. सायत (भातकुली) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात ग्रामपंचायत आरक्षण जाहीर

## बहुतांश ठिकाणी महिलाराज

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,(दि.9) -** अमरावती जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींसाठी 2025 ते 2030 या कालावधीतील आरक्षण यादी जाहीर झाली असून, धामणगाव रेल्वे तालुक्यातील 62 ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी आरक्षण घोषित करण्यात आले. तहसील कार्यालयात पार पडलेल्या सोडतीत उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, तहसीलदार अभय घोरपडे, वसंत पखाले व प्रफुल देशमुख यांच्या उपस्थितीत एका चिमुकल्याच्या हस्ते आरक्षण जाहीर करण्यात आले.

या आरक्षणात अनुसूचित जातींसाठी 8, अनुसूचित जमातींसाठी 4, मागासवर्गीयांसाठी 17, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी 33 ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे एकूण 32 ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव असून, यामुळे महिलाराजाचे वर्चस्व दिसून येत आहे.



**अनुसूचित जाती** - झाडा (महिला), चिंचोली (महिला), आष्टा (खुला), गव्हा फरकाडे (खुला), हिरपुर (खुला), अशोकनगर (महिला), दाभाडा (महिला), काशिखेड (खुला)

**अनुसूचित जमाती** - कळाशी (खुला), घुसळी कामनापूर (महिला), नायगाव (खुला), वरुड बगाजी (महिला) **नागरिकांचा मागास प्रवर्ग** - 17 ग्रामपंचायती : बोरगाव धांदे, जळगाव आर्वी, वाठोडा बु., वकनाथ, निंबोली, निंभोरा राज, आजनगाव, विरुळ रॉघे, भातकुली (महिला) सोनेगाव खर्डा, झाडगाव, तळेगाव दशासर, अंजनसिंगी, अंजनवती, तरोडा, पेठरघुनाथपुर, बोरवघळ (खुला)

**सर्वसाधारण प्रवर्ग** - वडगाव राजदी, बोरगाव निस्ताणे, कावली, वसाड, जळगाव मंगरुळ, चिंचपूर, शिदोडी, तळणी, मलातपूर, शेंदुरजना खुर्द, तिवरा, सावळा, जळका पटाचे, देवगाव, कासारखेड, विटाळा (खुला) ढाकुलगाव, गव्हा निपाणी, मंगरुळ दस्तगीर, गोकुळसरा, दिघी महल्ले, पिंपळखुटा, निंभोरा बोडखा, रायपूर, गिरोली, वाघोली, वाढोणा, आसेगाव, नारगावंडी, जुना धामणगाव, गुंजी, उसळगव्हाण, हिंगणगाव (महिला)

### अनेक गावांमध्ये रंगणार चुरशीची लढत

आरक्षणामुळे काही राजकीय इच्छुकांच्या योजना कोलमडल्या असताना, काहींना अनपेक्षित संधी प्राप्त झाली आहे. देवगाव, जुना धामणगाव, कासारखेड, विटाळा, मंगरुळ दस्तगीर, चिंचपूर यांसारख्या संवेदनशील गावांमध्ये चुरशीच्या लढती रंगण्याची शक्यता आहे. खुल्या प्रवर्गात आलेल्या 33 ग्रामपंचायतींमध्ये मोठ्या प्रमाणावर चुरस पाहायला मिळेल. महिलांसाठी आलेल्या आरक्षणामुळे त्यांच्या नेतृत्व क्षमतेस चालना मिळेल आणि स्थानिक स्वराज्यात त्यांचा सहभाग वाढेल. एकूणच, ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धामणगाव रेल्वे तालुक्यात राजकीय हालचालींना गती मिळाल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.

# युवाशक्ती ग्रामविकास संघटने तर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## नितीन शिंदे यांना सुरक्षा व न्याय मिळवून देण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,(दि.9)-** नितीन शिंदे यांनी युवाशक्ती ग्रामविकास संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, यांच्याकडे निवेदन सादर करून न्याय व संरक्षणाची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, पंचायत समिती अचलपूर अंतर्गत इतर ग्रामपंचायतींमध्येही असेच भ्रष्ट कारभार सुरू असून, अशा प्रकरणात आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्यांना धमकावले जाते आणि मानसिक खच्चीकरण केले जाते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर आणि भ्रष्ट कंत्राटदारांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली.



गौरखेडा कुंभी (ता. अचलपूर) येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने गावातील सर्व वार्डांमध्ये काँक्रिट रस्त्याचे काम करण्यात आले आहे. मात्र हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्ते नितीन शिंदे यांनी केला आहे. त्यांनी यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या. परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे त्यांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा देत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांना लेखी पत्र दिले होते. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीस नितीन शिंदे यांना बोलावण्यात आले होते. बैठकीत कामाच्या दर्जावर चर्चा झाली, मात्र कोणताही तोडगा निघाला नाही. विशेष म्हणजे, शिंदे यांच्या मते त्या बैठकीला हल्लेखोर व्यक्तीही उपस्थित होता. त्याच रात्री नितीन शिंदे यांच्यावर हल्ला करण्यात आला व त्यांना मारहाण झाली. या घटनेची तक्रार परतवाडा पोलिस स्टेशन येथे दाखल करण्यात आली आहे. निवेदन देताना युवाशक्ती संघटनेचे अध्यक्ष इमरान पठाण, जिल्हाध्यक्ष प्रमोद घाटे, उपाध्यक्ष पवन पाटणकर, जिल्हा संघटक संतोष भालेराव, सहसचिव निलेश गजभिये, उपाध्यक्ष मुकेश गावंडे, सामाजिक कार्यकर्ते संतोष माकोडे, जय शिंदे, बंटी ठोकने तसेच अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवगाव ते धामणगाव गढी रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना त्रास

## रस्ता दुरुस्तीची नाना शेळके यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,(दि.9) -** पावसामुळे देवगाव ते धामणगाव गढीतील रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असून रस्त्यावर खड्डे पडल्याने व पाणी साचल्याने नागरिकांना जाण्या येण्यासाठी अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे खराब झालेल्या या रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी काँग्रेस कार्यकर्ता नाना शेळके यांच्याकडून केल्या जात आहे.



देवगाव ते धामणगाव गढी रस्ता हा मेळघाट मतदार संघात येत असून या रस्त्यावर मोठं मोठी खड्डे पडले आहेत अशात पाऊस सुरु असून खड्डे पाण्याने भरल्याने खड्डे चुकविण्याच्या नांदात वाहन चालकाचे अनेक अपघात झाले आहे तर काही ठिकाणी झालेल्या रस्त्याची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झाली असल्याने रस्ते उखडले आहे. अशा रस्त्यावर सुद्धा पावसाचे पाणी साचुन चिखल तयार होत आहे तर आजच्या रस्त्यावरून जाण्या येण्यासाठी नागरिकांना जुना त्रास होत आहे. पावसाळ्यात ग्रामीणभागातील अनेक रस्त्याची झालेली अतिशय दुरावस्था लक्षात घेता तसेच नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता या रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी अशी मागणी काँग्रेस कार्यकर्ता नान्या शेळके यांनी केली आहे. तर ज्या भागात रस्त्या अतिशय खराब झाले असेल. अशा भागात प्रशासनाने लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी नान्या शेळके सह रमेश शनवरे, नामदेव येवले, राजा खडके, हिरालाल तोटे, अशोक दांडेकर, धीरज काळे, शाम शेळके, शाम येवले यांनी केली आहे.

# करजगावच्या भारती पोहोरकर यांची मृग बहार बाग ठरतेय प्रेरणादायी

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.9) -** करंजगाव महसूल मंडळातील खेल चौधर मौजे येथील भारती अरुणराव पोहोरकर या महिला शेतकरी शेती आणि शिक्षण यांचा उत्कृष्ट समन्वय साधत आदर्श निर्माण करत आहेत. एम. कॉम. पर्यंतचे शिक्षण घेत असतानाच त्यांनी शेतीकडेही लक्ष दिले आणि परिपूर्ण अभ्यास करून 180 रंगपुरी संत्र्यांची कलम लावली. आज ही बाग मृग बहारात प्रेरणादायी ठरत आहे1



फक्त दोन जणींच्या कुटुंबात आईसोबत रहाणाऱ्या भारतीताईंनी एकीकडे पार्ट-टाईम अकाउंटची नोकरी केली, तर दुसरी कडे शेती कडेही प्रामाणिकपणे लक्ष दिले. त्यांनी 1 एकर 4 गुंठ्यांत संत्र्याची झाडे लावून सात वर्षे जपून मोठी केली. याआधी त्या शेतीमध्ये मिरची, कांदा अशा पिकांचीही लागवड करत होत्या.

एप्रिल-मे महिन्यांत अनेक शेतकऱ्यांनी मृग बहारासाठी संत्र्यांच्या बागा ताणावर सोडल्या होत्या. मात्र, त्या काळात झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक बागा मृग बहारापासून वंचित राहिल्या. याउलट भारती पोहोरकर यांनी काटेकोर नियोजन, वेळोवेळी केलेली निगा आणि योग्य तांत्रिक सल्ल्याच्या जोरावर मृग बहार यशस्वीरीत्या फोडली. आज त्यांच्या संत्र्याच्या बागेत प्रत्येक झाडावर मृग बहार फुललेला दिसतो. त्यांचे यश पाहण्यासाठी अनेक शेतकरी आज दूरवरून त्यांच्या बागेत भेट देत आहेत. त्या सांगतात, पुष्पक खापरे, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, चांदूरबाजार सिट्रस इस्टेट, आणि कृषी विभाग, चांदूरबाजार यांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन माझ्या यशाचे खरे कारण ठरले.

> प्रत्येक महिलेने आपल्या घरच्या शेतीत थोडंफार लक्ष देणं ही आजची गरज आहे. या अवकाळी हवामानात मृग बहार फोडण्याचं तंत्रज्ञान मी शेतकऱ्यांना निशुल्क आणि निस्वार्थपणे देत असून शेतीतील नविन प्रयोग शेअर करताना मला खूप समाधान मिळतं.
>
> **भारती पोहोकार**
> **महिला शेतकरी.**

# क्षितिज अभ्यंकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.9) -** राहुल व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क्षितिज म. अभ्यंकर यांचा वाढदिवस शनिवार, 5 जुलै रोजी त्यांच्या निवासस्थानी विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कांता अभ्यंकर, राजेंद्र ढेपे, पद्मा ढेपे, जयकुमार अभ्यंकर, गजानन वानखडे (सचिव), प्रा. शुभांगी अभ्यंकर, माजी प्राचार्य सतीश पुंडकर, मंगला वंजारी, सीमा ठाकरे, अजय ठाकरे, जयश्री चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानिमित्ताने संस्थेअंतर्गत सर्व विद्यालयांमध्ये हस्ताक्षर, वक्तृत्व, चित्रकला, तसेच ग्रीटिंग कार्ड मेकिंग अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.विशेष आकर्षण ठरले ते 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाअंतर्गत संपूर्ण विद्यालयांमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम, ज्यामध्ये उपस्थित मान्यवरांनी वृक्ष भेट देऊन सहभाग घेतला. क्षितिज अभ्यंकर यांनी या प्रसंगी 'शेतकऱ्यांचे कैवारी महात्मा फुले' आणि 'ओळख कर्तृत्वाची' ही पुस्तके संस्थेतील सर्व मुख्याध्यापकांना भेट दिली. याप्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी आमदार रवी राणा, प्रकाश काळपांडे, संगीता शिंदे, किशोर बोरकर, शाम गायगोले, रामेश्वर अभ्यंकर, ॲड. अमोल ठाकरे, पंकज मोरे (जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस), दिशेब्बा जामनिक, सुरेंद्र चोपकार, जयंत मेटे, वासुदेवराव वानखडे, अविनाश मुरकूटे, विजय दामले, अदिल भाई, नमुभाई, विनोद सरदार, श्रीकांत धानोरकर, छोटू कोलते, जयंतराव खरपे, संजय कावळे, नरेंद्रजी दिघेकर, श्रीतेज धानोरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# आजीसोबत देवळात जात असलेल्या चिमुकल्यावर कोसळला काळ

## हिवरखेड येथे भिंत कोसळून तीन वर्षीय चिमुकला ठार ■ आजी गंभीर जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.9 )** - मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे झालेल्या एक धक्कादायक घटनेत तीन वर्षीय चिमुकल्याचा भिंत कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला. मृतकाचे नाव स्वरूप प्रशांत गांजरे (वय 3 वर्ष) असून तो आपल्या आजीसोबत दर्शनासाठी जात असताना या दुर्दैवी घटनेचा बळी ठरला.

प्राप्त माहितीनुसार, दि. 08 जुलै रोजी सायंकाळी सुमारे 8 वाजेच्या सुमारास ही घटना घडली. मृतक स्वरूप गांजरे आपल्या आजी रेखा सुखदेवराव गांजरे यांच्यासोबत गावातील अवधूत महाराज मंदिराकडे पायदळ जात होता. त्यावेळी सुरेंद्र खेरडे यांच्या घराजवळून जात असताना अचानक सुरू झाला. त्यामूळे खेरडे यांच्या भिंतीच्या जवळ उभे असताना घराची जुनी भिंत कोसळली. त्या भिंतीच्या मलब्याखाली दबून स्वरूप याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्या आजीला गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर उपचार सुरू



आहेत. ही दुर्दैवी घटना झाल्यानंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतकाचा चुलत भाऊ भुषण अरुणराव गांजरे (वय 29 वर्ष) यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पो.हवा. सुधीर राणा (ब.न. 1319, पोस्टे मोर्शी) यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी याप्रकरणी 40/2025 चा गुन्हा भारतीय दंड संहितेच्या कलम 194 बी एन एस अंतर्गत नोंदवून मर्ग दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे. ही घटना म्हणजे प्रशासनाने धोकादायक इमारती, जुन्या भिंतींच्या दुरवस्थेकडे वेळीच लक्ष न दिल्याचा परिणाम असल्याचे स्थानिकांनी सांगितले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा दुर्घटनांची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने तत्काळ सर्व धोकादायक घरांची पाहणी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणीही नागरिकांतून केली जात आहे. तीन वर्षीय चिमुकल्याचा असा अचानक मृत्यू झाल्यामुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

# मल्टीस्टेट बँकचे अमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची उचल

■ निरज मल्टीपर्पज निधी लि. महाघोटाळा प्रकरण

■ फसवणूक प्रकरणात गावखेड्यातून जनआंदोलनाची तयारी




### साताऱ्याच्या मोठ्या नेत्याशी कनेक्शन

गिर्हे दाम्पत्याचे साताऱ्याच्या शिंदे नामक एका मोठ्या नेत्यासोबत कनेक्शन होते. त्याच राजकीय कनेक्शनचा दबाव वापरुन ते पोलीस मॅनेज तर करित नाही ना? असा प्रश्न जनसामन्यांना पडत आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** - निरज मल्टीपर्पज निधी लि. व निरज अर्बन को ऑप बँक ही लवकरच मल्टीस्टेट होणार आहे, याकरिता 1 कोटी रुपये डीपॉजीट करावे लागतात असे सांगून संचालक युवराज भगवान गिर्हे याने बँकेच्या विविध शाखेमधून कोट्यवधीची उचल केली असल्याची माहिती आहे. हे कोट्यवधी रुपये आपल्या वैयक्तीक कामाकरिता गिर्हेने खर्च केले असल्याची माहिती. चांदूर रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर आता हा तपास आर्थिक शाखेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. परंतू आता ज्या पोलीस स्टेशनला तक्रार जात आहे, त्या पोलीस स्टेशन गुन्हा दाखल केला जात नाही, त्यामूळे गावखेड्यातील लोक पोलीस प्रशासनाविरुध्द जनआंदोलनाची तयारी करित आहेत.

निरज मल्टीपर्पज निधी लि. व निरज अर्बन को ऑप बँकेमध्ये जवळपास 150 अधिकारी व कर्मचारी काम करायचे, बँकेचा संचालक युवराज गिर्हे जेव्हा बँकेच्या शाखेतून मोठी रक्कम उचायचा तेव्हा या बँक कर्मचाऱ्यांना संशय यायचा, तेव्हा तो आपली बँक आता लवकरच मल्टीस्टेट होणार आहे, असे अमिष या कर्मचाऱ्यांना द्यायचा अशी माहिती आहे. गिर्हे बँके मल्टीस्टेट करण्याकरिता 1 कोटी रुपयांची अनामत रक्कम आरबीआयकडे जमा करावी लागते, असे सांगायचा.

बँक मल्टीस्टेट झाली की, तुमचेही वेतन दुपटीने वाढतील असे अमिषही या कर्मचाऱ्यांना दिले जायचे. त्यामूळे बँकेत पैसे नसताना खिशातून पैसे लावून हे कर्मचारी ग्राहकांना डेबिट द्यायचे, परंतू जेव्हा मल्टीस्टेटच्या नावाने गिर्हेने आपली फसवणूक केली आहे, हे जेव्हा कर्मचाऱ्यांना कळले तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

# पांढुर्णा चौकातील नगर परिषदेने काढले अतिक्रमण

### दुकानदारांचे आर्थिक नुकसान




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.9 )**- शहरातील पांढुर्णा चौकात वाढत चाललेल्या अतिक्रमणाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने 1 जुलै रोजी अतिक्रमण धारकांना लेखी नोटीस देऊन स्वखुशीने अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले होते. मात्र, संबंधित दुकानदारांनी नोटीसकडे दुर्लक्ष केल्याने अखेर 9 जुलै रोजी नगरपरिषदेने जेसीबीच्या साह्याने अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू केली.

पांढुर्णा चौक ते जॉइंट्स चौक या मार्गावर अनेक दुकानदारांनी नाल्यांवर टिनाचे शेड व स्लॅब टाकून अतिक्रमण केले होते. यामुळे नाल्यांची सफाई करणे अशक्य झाले होते. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे नाली सफाई अत्यावश्यक असून जलसांड टाळण्यासाठी ही कारवाई महत्त्वाची ठरली.

1 जुलै रोजी बजावलेल्या नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले होते की, तीन दिवसांत अतिक्रमण हटविले नाही तर 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965' च्या कलम 119 अंतर्गत कारवाई केली जाईल. तसेच अतिक्रमण काढताना झालेल्या नुकसानास अतिक्रमणधारक स्वत: जबाबदार राहील, असेही नमूद करण्यात आले होते.

दुकानदारांनी वेळेत अतिक्रमण न काढल्यामुळे जेसीबीच्या सहाय्याने हे अतिक्रमण हटवण्यात आले. परिणामी अनेक दुकानांचे आर्थिक नुकसान झाले आहे. काही नागरिकांनी यावर नाराजी व्यक्त केली असली तरी शहरातील सार्वजनिक स्वच्छता आणि वाहतूक सुरळीत राहण्यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# जबरी चोरीतील आरोपी जेरबंद

### शिरजगाव कसबा पोलिसांची यशस्वी कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**शिरजगाव कसबा, ( दि.9 )**- परतवाडा परिसरात एका ऑटोचालकाकडून चाकूचा धाक दाखवत 20,000 रुपयांची जबरी चोरी करणाऱ्या अनोळखी आरोपीला शिरजगाव कसबा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत अटक करून मोठे यश मिळवले आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली होती. दिनांक 4 जुलै 2025 रोजी गुन्हा क्रमांक 267/2025 नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम 309(4) अंतर्गत ही तक्रार दाखल करण्यात आली होती. फिर्यादी मंगेश भाऊराव सोलव (वय 44), रा. कु-हा, ता. चांदुरबाजार, हे आपल्या ऑटोने कु-हा ते परतवाडा मार्गावर प्रवासी सेवा करत होते. 3 जुलै रोजी सकाळी ते परतवाडा येथे गेले आणि भाच्याकडून 20,000 रुपये घेतल्यानंतर सायंकाळी परत निघाले असता वाटेत त्यांनी तीन प्रवाशांना घेतले. त्यातील एका अनोळखी प्रवाशाने आपले नाव 'अनिकेत' असल्याचे सांगितले होते. खरपी टी-पॉइंटनंतर आरोपीने लघवीचा बहाणा करून ऑटो थांबवायला लावला. त्यानंतर चाकूचा धाक दाखवत पँटच्या खिशातील रोख 20,000 रुपये जबरीने हिसकावून घेऊन तो अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. पोलिसांनी घटनेच्या गांभीर्याची दखल घेत तत्काळ तपास सुरू केला. आरोपी फक्त 'अनिकेत' या नावाने ओळख दिल्याने त्याचा शोध घेणे आव्हानात्मक होते. मात्र, गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली आणि अनिकेत नावाचा संशयित इसम बडनेरा येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून 12,000 रुपये रोख रक्कम, चोरीसाठी वापरलेला चाकू आणि इतर साहित्य जप्त केले.

# मेळघाटातील अवैध धंद्यांवर तातडीने अंकुश लावा!

### भिलावेकर यांची ठाम भूमिका

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.9 )** - मेळघाटातील धारणी व चिखलदरा या तालुक्यांमध्ये अनेक वर्षांपासून वरली मटका, अवैध दारू विक्री आणि रेती उपसा यांसारखे बेकायदेशीर धंदे बिनधास्त सुरू आहेत. हे सर्व धंदे स्थानिक अधिकारी आणि दलाल यांच्या संगनमताने चालत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.मेळघाटातील वाढत्या अवैध धंद्यांविरोधात ठोस भूमिका घेत भारतीय जनता पक्षाचे मेळघाट, अमरावती ग्रामीण जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी राज्याचे महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदन सादर केले. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, दि. 11 जुलै 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे.

अवैध धंद्यामूळे आदिवासी समाजातील लोकांना सट्टूयाची सवय लागली असून शिक्षणापासून तरुण पिढी वंचित राहत आहे. प्रभुदास भिलावेकर यांनी या समस्यांवर ठोस कारवाईसाठी सरकारकडे आग्रह धरला आहे. विशेषत: मेळघाटातील लोक दुर्गम भागात मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात, त्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी या धंद्यांवर बंदी आणणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीमुळे अवैध धंदे चालवणाऱ्यांच्या गोटात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मेळघाटातील नागरिकांनीही या कारवाईचे स्वागत करत प्रशासनाच्या पाठीशी उभे राहण्याचे संकेत दिले आहेत.

### युरियाच्या लिकींग मूळे शेतकरी संकटात

तसेच, परिसरातील आणखी काही गंभीर समस्या चर्चेत आल्या आहेत. यंदा मक्याचे उत्पादन भरघोस झाल्याने युरिया खताची मागणी वाढली आहे, मात्र 'लिंकिंग' प्रणालीमुळे अडचणी निर्माण होत आहेत. शासनाने या समस्येवरही तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी आहे.

### हिंस्त्र प्राण्यांचा बंदोबस्त करावा

हरिसाल परिसरात वाघाच्या हल्ल्यांमुळे चार नागरिकांचा मृत्यू झाला असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, वनविभागाने तातडीने कारवाई करून वाघाला जेरबंद करावे, अशी मागणी करण्यात आली.



"मेळघाटातील वाढती अवैध दारू विक्री, मटका व रेती उपसा यामुळे परिसरात सामाजिक ढासळ निर्माण झाली आहे. युवकांची दिशा भरकटत आहे. दुसरीकडे शेतकरी युरियाच्या टंचाईने त्रस्त आहेत. याशिवाय हरिसाल परिसरात वाघाच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.प्रशासनाने कठोर पावले उचलून उपाययोजना कराव्यात.

**प्रभुदास भिलावेकर,**
**जिल्हाध्यक्ष भाजप, अमरावती.**

# पोलिसाकडून पत्नीला मारहाण

**अमरावती** - दारूच्या नशेत पत्नीला मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ केल्या प्रकरणी पोलीस कर्मचाऱ्यावर परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचे नाव अरविंद मारोती केराम (रा. गणेशपूर, झरीपाटण, जि. यवतमाळ) असे असून, सध्या आसेगाव पोलीस ठाण्यात हेड कॉन्स्टेबल पदावर कार्यरत आहे.

# अमरावतीत पोलिस दलात मोठी खांदेपालट

## 7 एपीआय व 8 पीएसआयंच्या बदल्या ■ वाचक शाखेतील कडू गुन्हे शाखेत दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** - शहर पोलीस आयुक्तालयात बुधवारी रात्री 7 सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) आणि 8 पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) यांच्या तात्पुरत्या बदल्यांचे आदेश निर्गमित झाले. या बदल्यांमुळे शहरातील अनेक ठाण्यांतील अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल झाला असून, काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची गुन्हे शाखेतही नियुक्ती करण्यात आली आहे.

या बदल्यांमध्ये बडनेरा पोलीस ठाण्याच्या एपीआय मेघाली गावंडे यांची बदली महिला कक्षात करण्यात आली आहे. नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या एपीआय वैशाली चव्हाण यांची बदली फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात, डायल 112 मधील एपीआय दीपाली राऊत यांची बदली नागपुरीगेट पोलीस ठाण्यात, गाडगेनगरच्या एपीआय सोनाली मेश्राम यांची बदली बडनेरा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. गुन्हे शाखेतील महेंद्र इंगळे यांची वाचक शाखेत बदली झाली असून वाचक शाखेतील अमोल कडू यांची बदली गुन्हे शाखा युनिट 2 मध्ये करण्यात आली आहे. गुन्हे शाखा युनिट 2 मधील इमरान नाईकवडे यांची गुन्हे शाखा युनिट 1 मध्ये रवानगी करण्यात आली आहे.

पीएसआय बदल्यांमध्ये वलगाव पोलीस ठाण्याचे पीएसआय विश्वजीत सरनाईक यांची बदली फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात, राजापेठचे पीएसआय गंगाधर जाधव यांची वलगाव पोलीस ठाण्यात, वलगावचे पीएसआय रवींद्र खेडेकर यांची राजापेठ पोलीस ठाण्यात बदली झाली आहे. नियंत्रण कक्षातील सुषमा आठवले यांची बदली गाडगेनगर पोलीस ठाण्यात, डायल 112 चे गजानन रेवसकर व वाचक शाखेतील विलास जामनेकर यांना एक वर्षाची स्थगिती देण्यात आली आहे. फ्रेजरपुराचे पीएसआय आकाश वाठोरे यांची बदली वलगाव ठाण्यात, गुन्हे शाखा युनिट 1 मधील पीएसआय प्रकाश झोपाटे यांची न्यायालयीन पैरवी कक्षात, कंट्रोल रूममधील मोहन केवटी यांची भातकुली पोलीस ठाण्यात, राजापेठ पोलीस ठाण्यातील पीएसआय भारती मामनकर यांची बदली वलगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


# अमरावती महानगरपालिका, अमरावती

**कार्यकारी अभियंता-2 विभाग**

**क्र. अमनपा/का.अ-2/नि.सु.क्र./09/2025** **दिनांक:-09/07/2025**

अमरावती महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता-2 विभागामार्फत ई-निविदा कामासाठी ब-1 निविदा करारावरील अमरावती महानगरपालिकेत योग्यश्रेणीत नोंदणी करण्यात आलेल्या कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहे.

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील :-**

| | |
|---|---|
| ई- निविदा प्रसिध्दी | दिनांक 09/07/2025 |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ (Start) | दिनांक 09/07/2025 दु. 6.00 वाजेपासुन |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त (End) | दिनांक 17/07/2025 दु. 4.00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दिनांक 09/07/2025 दु. 6.00 वाजेपासुन |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांका 17/07/2025 दु. 4.00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक (Technical) | दिनांक 18/07/2025 दु. 12.00 वाजता (शक्य झाल्यास) |

(Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल.

निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचना पाहवण्यास मिळेल.

**( रविन्द्र पवार )**
**कार्यकारी अभियंता-2**
**महानगरपालिका, अमरावती.**

**अमनपा/जसंवि/110/2025**
**दिनांक:-09/07/2025**


# धामणगाव रेल्वे तालुक्यात मुसळधार पावसाचा कहर

## हजारो एकर शेती पाण्याखाली, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.9 )**- तालुक्यात सलग चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. रविवारी रात्रीपासून पडू लागलेल्या जोरदार पावसाचा जोर अजूनही कायम असून, त्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. अनेक गावांमध्ये रस्ते पाण्याखाली गेले असून, नागरिकांची हालअपेष्टा वाढल्या आहेत.



तालुक्यातील सोनेगाव-खर्डा येथील नदीला पूर आल्याने आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. कासारखेड गावात रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. काही भागांत नागरिकांना अत्यावश्यक गरजांसाठी देखील घराबाहेर पडणे कठीण बनले आहे. मगरुळ दस्तगीर परिसरात सततच्या पावसामुळे एक घर कोसळल्याची घटना घडली, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### दुबार पेरणीचे संकट

या सततच्या पावसामुळे तालुक्यातील सोयाबीन, तूर, कापूस यासारखी खरीप पिके मोठ्या प्रमाणात पाण्याखाली गेली आहेत. अंदाजे हजारो एकर शेतीवर पाणी साचल्यामुळे बियाण्यांचे नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. प्रशासनाकडून पूरस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. काही ठिकाणी आपत्कालीन पथकांची तैनाती करण्यात आली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानभरपाई मिळवून देण्याची मागणी केली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अपघातानंतरच रेल्वे प्रशासनाला जाग येणार का?

## मालखेड येथील नागरिकांचा संतप्त सवाल ■ अंडरब्रिजखालच्या रस्त्याची दयनीय अवस्था

**रवि कलाने**

**चांदूर रेल्वे,( दि.९ )** - अमरावतीङ्कमालखेड मुख्य मार्गावरील मालखेड नजीकच्या रेल्वे अंडरब्रिजखालील रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. सततच्या पावसामुळे रस्त्यावरील खड्डे जलाशयात रूपांतरित झाले असून, आतील लोखंडी सळाखी उघड्यावर आल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे.

मात्र, या गंभीर परिस्थितीकडे रेल्वे प्रशासन पूर्णत: दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. कोणाचा जीव गेला तरच रेल्वे प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल गावकऱ्यांनी केला आहे.



### लोखंडी सळाख्या, खड्डे आणि चिखलाचा अडथळा

पुलाखालील रस्त्यावर खोल खड्डे निर्माण झाले असून त्यामध्ये पाणी साचले आहे. या खड्ड्यांमधून जाणाऱ्या वाहनचालकांना धाडसानेच मार्गक्रमण करावे लागते. रस्त्याच्या आतील लोखंडी सळाख्या बाहेर आल्यामुळे दुचाकी किंवा चारचाकी वाहनांची चाके अडकण्याचा धोका निर्माण झाला आहे.

### दैनंदिन वाहतुकीस अडथळा, नागरिक त्रस्त

दररोज शाळकरी मुले, प्रवासी, नागरिक यांना या रस्त्यानेच प्रवास करावा लागतो. चिखल व दुर्गंधीमुळे श्वास घेणेदेखील कठीण झाले आहे. यापूर्वी देखील काही अपघात झाले असूनही रेल्वे प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा आरोप नागरिक करत आहेत.

### त्वरित रस्ता दुरुस्ती करा!

‘मोठमोठ्या सळाखी बाहेर निघाल्या, चिखल आणि घाणीचे साम्राज्य आहे. दररोज विद्यार्थी आणि नागरिकांना या रस्त्याने प्रवास करावा लागतो. याआधीही अपघात झालेत, पण रेल्वे प्रशासन दुर्लक्षच करत आहे. एखाद्या जीवितहानीची वाट पाहत आहेत का? हा रस्ता तातडीने दुरुस्त करावा.

**लता पाटील, सरपंच, मालखेड रेल्वे**

### स्मरणात राहिल अशी भिंत कोसळली, तरीही जाग नाही!

अलीकडेच पावसाच्या सुरुवातीस मालखेड रेल्वे अंडरब्रिजची भिंत कोसळून गावाची संपर्कव्यवस्था तुटली होती. त्या वेळीही रेल्वे प्रशासनाचा भोंगळ कारभार समोर आला होता. मात्र त्यातून काहीच बोध न घेता, आता पुन्हा रस्ता दुरवस्थेत आहे.

# अचलपूर तालुक्यात खरीपाची 81 टक्के पेरणी पूर्ण

### कपाशीची सर्वाधिक लागवड

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.९ )**- तालुक्यातील खरीप हंगामात शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभागी होत आजअखेर 81 टक्के पेरणी पूर्ण केली आहे. यावर्षीही कपाशी शेतकऱ्यांची पहिली पसंती ठरली असून, एकूण 14,967 हेक्टर क्षेत्रावर कपाशीची पेरणी करण्यात आली आहे. त्यानंतर सोयाबीन आणि तुर या पिकांचा क्रम आहे.



कृषी विभागाच्या अहवालानुसार, अचलपूर तालुक्यातील एकूण 41,859.30 हेक्टर हे लागवडीयोग्य क्षेत्र असून, त्यापैकी 36,542.90 हेक्टर क्षेत्रावर विविध खरीप पिकांची लागवड पूर्ण झाली आहे. यामध्ये कपाशी 14,967 हे., सोयाबीन 9,937 हे., तुर 9,222 हे., खरीप ज्वारी 604 हे., मुग 30 हे., उडीद 13 हे., मका 613 हे., भाजीपाला 414 हे., फुलशेती 5 हे. आणि इतर 736 हेक्टर क्षेत्रांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, यावर्षी मृग नक्षत्र काळात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याने काहीशा अडचणी असतानाही, पेरणीचे काम यशस्वीरीत्या पार पडल्याचे दिसून येते. यामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगामाबाबतचा आत्मविश्वास वाढला आहे. वऱ्हाड प्रांत हा परंपरेने ‘कॉटन बेल्ट’ म्हणून ओळखला जातो. मात्र, मागील काही वर्षांपासून बोंडअळीचा प्रादुर्भाव, वाढलेला उत्पादन खर्च आणि घटलेले बाजारभाव यामुळे शेतकऱ्यांनी कपाशीपासून माघार घेतली होती. यंदा मात्र परिस्थितीत बदल झाला असून, शेतकरी पुन्हा पांढऱ्या सोन्याकडे वळताना दिसत आहेत. कृषी तज्ज्ञांच्या मते, जर हवामान अनुकूल राहिले आणि बाजारात समाधानकारक दर मिळाले, तर यावर्षी कपाशी उत्पादनात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अचलपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हा खरीप हंगाम आशादायक ठरू शकतो.


# सावंगा (विठोबा) नगरीत आषाढी गुरुपौर्णिमा पर्वावर होणार ‘चंदन-उटी’ उत्सव

### 11 जुलै ला होणार गुरुपूजन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.९ )**- तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे ‘आषाढी गुरुपौर्णिमा उत्सव’ मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा होणार आहे. श्री विठोबा संस्थान (श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान) यांच्या वतीने दि. 10 जुलै 2025 रोजी, गुरुवारी दुपारी 4 वाजता, भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत ‘चंदन-उटी’ हा प्रमुख सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर दि. 11 जुलै 2025 रोजी शुक्रवार सकाळी ‘गुरुपूजन’ सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

‘सावंगपूरचे राजे विठोबा



कराहो बादशाही!

मन माझं मोहिलं, माय माझी विठ्ठल-रुख्माई!’

येथील अवधूत महाराज यांची पूजाअर्चा विठोबाच्या स्वरूपात केली जाते. त्यामुळे आषाढी गुरुपौर्णिमेला या स्थळी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही ही परंपरा भक्तिभावाने पाळली जाणार असून गावातील आणि बाहेरगावातील हजारो भाविकांची उपस्थिती



अपेक्षित आहे. अलीकडेच पार पडलेल्या ज्येष्ठ अमावास्येच्या चंदन-उटी सोहळ्यात देखील हजारो भाविकांनी सहभाग नोंदवला होता. %कापुर जाळून% मनोकामना व्यक्त करण्याची भक्तांची परंपरा यावेळीही अनुभवता आली. अशा पवित्र वातावरणात पुन्हा एकदा आषाढी गुरुपौर्णिमा भाविकांसाठी एक खास पर्वणी ठरणार आहे. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी, प्रवीण कुकडकर हे सर्व विश्वस्त मंडळ प्रयत्नशील आहेत.यावेळी महाप्रसाद (अन्नदान) समितीमार्फत बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदानाचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने सर्व श्रद्धावान भाविकांना तन, मन आणि धनाने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रस्ते अपघात रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.९ )** - जिल्ह्यातील अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता, पोलिसांनी 100 अपघात-प्रवण स्थळांची यादी निश्चित केली आहे. या ठिकाणी संयुक्त पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा रस्ते सुरक्षा विषयक बैठकीत, अधिक्षक अभियंता रूपा गिरासे, प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, कार्यकारी अभियंता गिरी आदी अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्ग, तसेच मेळघाटातील अरुंद रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे




संबंधित यंत्रणांनी एकत्र येऊन अपघात टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात. स्पीडगनचा प्रभावी वापर, रस्त्यांच्या दुतर्फा झाडांच्या फांद्या कापणे, दृष्यमानता सुधारणे, यावर भर द्यावा. मेळघाटात अपघात झाल्यास क्रेन व टोईंग सेवा त्वरित पोहोचत नाही. म्हणून परतवाडा येथे या सेवांची व्यवस्था करावी. तसेच या सेवांना ऑन-कॉल पद्धतीने उपलब्ध ठेवण्यासाठी पॅनेलवर घेण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे.अपघाताची माहिती आयआरडीए यंत्रणेवर अपलोड करावी, जेणेकरून अपघातांचे विश्लेषण करता येईल.शासनाच्या नव्या निर्देशानुसार, गोल्डन अवरमध्ये अपघातग्रस्तांना दीड लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार मिळणार आहेत. यासाठी 7 दिवसांत क्लेम करणे आवश्यक असून, जिल्हा शल्य चिकित्सकांच्या मंजुरीनंतर रुग्णालयांना रकमेचे वितरण केले जाईल.

# रस्ते की, तलाव : जुना धामणगावात प्रचंड दुरावस्था

## लोकप्रतिनिधी व्यस्त भांडणात, ग्रामस्थांचे जीवन मात्र कष्टमय







**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.९ )** - अमरावती जिल्ह्यातील जूना धामणगाव ग्रामपंचायत हे गाव विकासाच्या मुख्य प्रवाहातून दूर पडले आहे. पावसाळा सुरू होताच येथे ‘रस्ते की तलाव?’ असा प्रश्न विचारावा लागतो. गावातील मुख्य रस्त्यांवर पाणीच पाणी साचल्यामुळे ते अक्षरश: जलाशयासारखे झाले आहेत, तर संबंधित लोकप्रतिनिधी मात्र परस्परविरोधी भांडणांमध्ये गुंतले असून, गावकऱ्यांच्या व्यथांकडे कोणीच लक्ष देत नाही. या भागातील प्रमुख रस्त्यांवर मोठाले खड्डे आणि त्यात साचलेले पाणी हे आता नित्याचे दृश्य झाले आहे. वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पाण्यातून वाट काढावी लागते. पाय घसरून पडणे, चपला वाहून जाणे, वेळेवर पोहोचू न शकणे या समस्या नेहमीच्या झाल्या आहेत. पालकांच्या चिंतेत भर पडत आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष, लोकप्रतिनिधींची उदासीनता

ग्रामस्थांच्या सततच्या तक्रारी असूनही ना पाहणी झाली, ना ठोस उपाययोजना झाल्या. विकासाच्या गप्पा करणारे लोकप्रतिनिधी मात्र या गंभीर समस्येकडे मूग गिळून गप्प बसले आहेत.ग्रामस्थांचा संताप फक्त पावसाळ्यापुरता न राहता, लवकरच आंदोलनाच्या रूपात उमटू शकतो, अशी जोरदार चर्चा गावात सुरू आहे.

### आरोग्य व्यवस्थेवर गंभीर परिणाम

रुग्णांकरिता रुग्णवाहिका वेळेवर पोहोचू शकत नाही. काहीवेळा आजारी व्यक्तींना खांद्यावर किंवा हातावर उचलून रुग्णालयात न्यावे लागते, हे दृश्य आजही येथे पहायला मिळते.

# रोजगार हमी योजनेची देयके सात दिवसांत अदा करा!

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.९ )**- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत सुरू असलेल्या कामांसाठी देयके वेळेत न मिळाल्याबद्दल चिंता व्यक्त करत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तालुकास्तरीय यंत्रणांना देयक सात दिवसांत अदा करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या मनरेगा आढावा बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार,



उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक कासोदे, तसेच विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. येरेकर म्हणाले, रोजगार हमी योजनेंतर्गत कामांनंतर मस्टर रोल सात दिवसांच्या आत रोजगार सेवकांनी सादर करावेत. यासाठी तालुकास्तरावर रोजगार सेवकांची बैठक घेऊन समन्वय ठेवावा. प्राप्त मस्टर रोल तातडीने अपलोड करणे आणि देयक तत्काळ अदा करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देयक अडथळ्यांमधील आधार कार्ड संबंधित तांत्रिक अडचणी तातडीने सोडवाव्यात, असेही त्यांनी सांगितले. सध्या मनरेगाच्या अंतर्गत घरकुलांची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून ती वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देशही देण्यात आले.

### पावसाळ्यात गाळ काढणे व रस्त्यांची कामे टाळा

सध्या पावसाळा सुरू असल्याने गाळ काढणे व रस्त्यांचे काम टाळावेत, असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. काही यंत्रणांची गतकालीन कामे अपूर्ण असून तीही तातडीने पूर्ण करावीत, असे आदेश त्यांनी दिले. अकुशल श्रमिकांसाठी निधी उपलब्ध आहे; मात्र कुशल श्रमिकांसाठी निधी विलंबाने मिळतो, हे लक्षात घेऊन निधी मिळताच कामे पूर्ण करून अहवाल त्वरित सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.बैठकीत वन, कृषी, सामाजिक वनीकरण विभागांच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला.

# ‘टपाल’ ऑफीस झाले ‘टपक’ ऑफीस!

## गळतीमुळे महत्वाचे पार्सल खराब होण्याची भीती | लाखोचा व्यवहार, पण सुविधा शून्य

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.९ )** - येथील पोस्ट ऑफिस हे परिसरातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि वर्दळीचे ठिकाण असून रोज सुमारे दोन लाखांहून अधिक रुपयांचा आर्थिक व्यवहार येथे होतो. सुमारे पाच हजारांहून अधिक खातेदार या पोस्ट ऑफिसशी संबंधित असून, बँकिंग सेवा, पत्रव्यवहार, बचत योजना आणि इतर महत्त्वाचे व्यवहार येथे सुरळीत पार पडतात.

मात्र सध्या हे %टपाल% ऑफिस ‘टपक’ ऑफिसमध्ये रूपांतरित झाले आहे. छतावरील गळतीमुळे पावसाचे पाणी थेट कार्यालयात झिरपत आहे. यामुळे कार्यालयातील कागदपत्रे, रेकॉर्ड तसेच काही महत्त्वाचे पार्सल खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे. कर्मचाऱ्यांना काम करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे, तर नागरिकांची गैरसोयही दिवसेंदिवस वाढत आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असूनही



या कार्यालयाच्या देखभालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. साध्या छताच्या दुरुस्तीचीही व्यवस्था नसल्यामुळे शासकीय यंत्रणेच्या निष्काळजीपणाचे दर्शन घडत आहे.

या समस्येकडे लक्ष वेधत हिवरखेड ग्रामस्थांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे छताची तात्काळ दुरुस्ती करून कार्यालय सुरळीत ठेवण्याची मागणी केली आहे. पावसाळा अजून काही आठवडे चालू राहणार असल्याने दुरुस्ती लांबणीवर टाकल्यास नुकसान आणखी वाढण्याची शक्यता आहे.

पोस्ट ऑफिससारख्या संवेदनशील व महत्वाच्या शासकीय कार्यालयात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही संबंधित विभागांची जबाबदारी आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे तत्काळ कारवाई करून कर्मचार्यांना आणि खातेदारांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

## सार्वजनिक सूचना

माझ्या क्लायंटद्वारे पुरवलेली माहिती, अधिकार आणि दस्तऐवजांच्या आधारावर, हा सार्वजनिक सूचना मी सर्वसामान्य लोकांसाठी काढत आहे, की एक मूळ खरेदी खत, दिनांक 23/01/2014, नोंदणी क्र. 164/2014, विक्रेते विनोद मानकलालजी साबू आणि खरेदीदार दिपाली राजेश काकड यांच्याशी संबंधित मौजा प्रल्हादपुर, सर्वे क्र. 23-3, प्लॉट क्र. 5 ब ता.चांदुर बाजार यांच्या बाबतीत काही पत्रके हरवलेले आणि गहाळ झालेले आहेत.

जर कोणत्याही व्यक्तीला ते सापडले किंवा गहाण ठेवले असल्यास, कृपया 7 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कळवावे किंवा पाठवावे. हे लक्षात घ्या की त्यानंतर कोणतीही आपत्ती किंवा दावा स्वीकारला जाणार नाही.

शिक्का

स्वाक्षरी
अ‍ॅड. श्रीमती अनुपमा जैस्वाल
गावंडे ज्वेलर्स समोर,
परतवाडा, ता. अचलपूर,
जिल्हा अमरावती.
मो. नं. 9422914099

